**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

**विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जूनला योग दिवस समारोह कार्यक्रमाचे आयोजन**

अमरावती - (दि. १८.०६.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत पदव्युत्तर पदविका योग थेरपी व एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमाच्यावतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग दिवस समारोह कार्यक्रमाचे आयोजन दि. २१ जून, २०२२ रोजी सकाळी ७.१५ वाजता विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संकुलावर करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून डी.सी.पी.ई., अमरावतीच्या डॉ. लाजवंती चावला उपस्थित राहतील. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांची कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

सदर कार्यक्रम ७५ व्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, त्यांच्या अधिनस्त शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. १८/०६/२०२२.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

Win2PDF®

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/